# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## क क्षेत्रीय कार्यालय
## कार्यपत्रिका क्रमांक-५
## सभावृत्तांत

दि.- ०५/८/२०१५ वेळ -सकाळी ११:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्याक प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि.०५/८/२०१५ रोजी सकाळी ११:०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) **मा. मोटे किरण बाळासाहेब** **सभापती**
२) मा.सावळे सिमा रविंद्र
३) मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
४) मा.भोसले राहूल हनुमंतराव
५) मा.पालांडे सुजाता सुनिल
६) मा.सौ.पानसरे अमिना महंमद
७) मा.शितोळे शैलजा बाबुराव
८) मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
९) मा.शेंडगे आशा सुखदेव
१०) मा.संजय केशवराव काटे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. फुंदे डि.एम.-क्षेत्रीय अधिकारी, मा.रामकिसन लटपटे- प्रशासन अधिकारी, मा.दांगट- कार्यकारी अभियंता (स्थापत्य), मा.बोत्रे- उपअभियंता (स्थापत्य) , मा.सोनवणे-उपअभियंता,विदयुत, मा.शिंदे- उपअभियंता स्थापत्य, मा.वायकर- उपअभियंता स्थापत्य, मा.पुजारी- उपअभियंता (झोनिपू), मा.जावळे-उपअभियंता पापू, मा.रविंद्र भोकरे-सहा.आरोग्याधिकारी,मा.उगले-लेखाधिकारी, श्री.शेख-कनिष्ठ अभियंता (विदयुत), श्री.रमेश भोसले- मुख्य आरोग्य निरीक्षक हे अधिकारी उपस्थित होते.

----

**मा.सभापती**- उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करून सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

--------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक-१) सभेची वेळ व दिनांक बदलणेबाबत- मा.राजेंद्र काटे, मा.सिमा सावळे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-२) संत तुकारामनगर प्रभाग क्र.३९ येथील वल्लभनगर एस.टी.स्टँड ते नेहरुनगरकडे जाणा-या मुख्य रस्त्यांस “डॉ.पी. डी.पाटील मार्ग” असे नांव देणेबाबत- मा.सुजाता पालांडे,मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-३) संत तुकारामनगर प्रभाग क्र.३९ येथील एस.टी.स्टँड समोरील रोडलगत फुटपाथवरील मोडकळीस आलेल्या स्त्री व पुरुष मुतारी पाडणेबाबत- मा.सुजाता पालांडे,मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव.

---------

ठराव क्रमांक- १२६ विषय क्रमांक- १

दिनांक- ५/८/२०१५ विभाग-

सुचक- मा.राजेंद्र काटे अनुमोदक-मा. सिमा सावळे

संदर्भ- मा.राजेंद्र काटे,मा.सिमा सावळे यांचा प्रस्ताव.

क प्रभाग समितीची मासिक सभा ही प्रत्येक महिन्याचे पहिल्या बुधवारी सकाळी ११.०० वा.ऐवजी दु. ३.०० वा.(पहिल्या बुधवारी सार्वजनिक सुट्टी / सुट्टया असेल तर दुस-या दिवशी) क क्षेत्रीय कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक- १२८ विषय क्रमांक- २

दिनांक- ५/८/२०१५ विभाग-

सुचक- मा.सुजाता पालांडे अनुमोदक-मा.अमिना पानसरे

संदर्भ- मा.सुजाता पालांडे,मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव

संत तुकारामनगर प्रभाग क्र.३९ येथील वायसीएमएच समोरील परिसरातील असलेल्या रस्त्याला **"डॉ.पी.डी.पाटील"** यांचे नांव देणेत आलेले आहे सदरचे नांव तसेच कायम ठेवून डॉ.पी.डी.पाटील यांचे कार्य व नांवलौकिक विचारात घेता, वल्लभनगर एस.टी.स्टँड ते नेहरुनगरकडे जाणा-या मुख्य रस्त्यांस **"डॉ.पी.डी.पाटील मार्ग"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-----

ठराव क्रमांक- १२९ विषय क्रमांक- ३

दिनांक- ५/८/२०१५ विभाग-

सुचक- मा.सुजाता पालांडे अनुमोदक-मा.अमिना पानसरे

संदर्भ- मा.सुजाता पालांडे,मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव

संत तुकारामनगर प्रभाग क्र.३९ येथील एस.टी.स्टँड समोरील रोडलगत फुटपाथवरील मोडकळीस आलेल्या स्त्री व पुरुष मुतारी नादुरुस्त झालेली आहे. तसेच एस.टी.स्टँड समोरील मैदानात स्त्री व पुरुषांसाठी नव्याने स्वतंत्र मुता-या बांधणेत आलेल्या आहेत. त्यामुळे विषयांकित ठिकाणच्या मुता-यांचा उपयोगही करणे शक्य नाही. कारण त्या मोडकळीस आलेल्या आहेत.त्यामुळे त्या धोकादायक असून साफसफाई करणे शक्य नसलेमुळे दुर्गंधी पसरलेली आहे. तरी सदरच्या धोकादायक व निरउपयोगी मुता-या पाडणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(मोटे किरण बाळासाहेब )
सभापती क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय भोसरी २६
जा.क्र.कक्षेका/कावि/११२/२०१५
दिनांक-२४/८/२०१५

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा) क प्रभाग समिती

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.